**MaharashtraTimes**
**Title :**
**Author :**
**Location :**
**Article Date : 05/28/2016**



# इंजिनीअरिंग प्रवेशासाठी यंदा चार 'कॅप' राऊंड

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

बारावीच्या निकालानंतर मुंबईसह राज्यात 'मिशन अॅडमिशन'ची तयारी सुरू झाली असून अनेकांचे लक्ष इंजिनीअरिंग प्रवेशाकडे लागले आहे. यंदा इंजिनीअरिंगच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन नोंदणीला जूनला पहिल्या आठवड्यापासून सुरुवात होणार आहे. तर, सीईटीचा निकाल लागल्यानंतर प्रवेशप्रक्रिया जाहीर करण्यात येणार असल्याचे राज्य तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे सांगण्यात आले. यंदा इंजिनीअरिंग प्रवेशाचे एचार कॅप राऊंड होण्याची शक्यता आहे.

**प्रवेश नोंदणी जूनच्या पहिल्या आठवड्यापासून**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनायातर्फे दरवर्षी राज्यभरातील इंजिनीअरिंग प्रवेशप्रक्रिया राबविली जाते. यंदाच्या प्रवेशप्रक्रियेबद्दल डीटीईने माहिती दिली आहे. यंदा प्रथम वर्ष इंजिनीअरिंग पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या ऑनलाइन नोंदणीला जूनच्या पहिल्या आठवड्यात सुरुवात होणार आहे. यंदाही प्रवेश केंद्रीय प्रवेशप्रक्रियेतून (कॅप) होणार असून मूळ गुणपत्रिका आणि सीईटीचा निकाल जाहीर झाल्यानंतर प्रवेशप्रक्रियेचे वेळापत्रक तंत्रशिक्षण संचालनालयाकडून जाहीर केले जाईल. यंदा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना प्रवेश बेटरमेंन्टच्या संधीतून कन्फर्म करण्यासाठी फ्रीझ, स्लाइड, फ्लोट यापैकी एक पर्याय निवडावा लागणार आहे, विद्यार्थ्यांना चौथ्या फेरीपर्यंत प्रवेश बदलण्याची मुभा असेल, अशी माहिती डीटीईचे संचालक सु. का. महाजन यांनी दिली. तर, संस्था स्तरावरील प्रवेशासाठीसुद्धा राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने तयार केलेल्या गुणवत्ता यादीत उमेदवाराचे नाव असणे अनिवार्य आहे.

विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी केल्यानंतर अभ्यासक्रम आणि कॉलेज निवडी संदर्भातील प्रक्रिया १२ जूननंतर सुरू होण्याची शक्यता आहे. राज्यातील इंजिनीअरिंग कॉलेजातील तब्बल १७ हजार जागा यंदा कमी झाल्या आहेत. एआयसीटीईकडून आणखी २५ कॉलेजांची सुनावणी सुरू आहे. एकूण जागा निश्चित नसल्यामुळे ऑप्शन फॉर्म १२ जूननंतर सुरू होण्याची शक्यता आहे.